**प्रेसनोट दिनांक ०६/०७/२०१९**
**येरवडा पोलीस स्टेशन, पुणे**

**कम्युनिटी पोलीसींग व पोलीस काका या संकल्पने अंतर्गत नेताजी हायस्कूल, येरवडा, पुणे येथे जावून तेथील शिक्षक व शालेय विद्यार्थ्यांची बैठक घेवून त्यांना सुरक्षिततेे संदर्भात मागदर्शन केले बाबत.**

---

कम्युनिटी पोलीसींग व पोलीस काका या संकल्पनां अंतर्गत श्री.राजेंद्र कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, येरवडा पो.स्टे. यांचे मार्गदर्शनाखाली येरवडा पो.स्टे.कडील पो.उप.निरी. श्री. व्ही.जे.माने यांनी दि.०१/०७/२०१९ रोजी सकाळी ०९:४५ वा. ते ११:१५ वा.चे दरम्यान येरवडा पो.स्टे.चे हद्दीतील नेताजी हायस्कूल, येरवडा, पुणे येथे भेट देऊन, तेथील शिक्षकवर्गाची तसेच शालेय विद्यार्थी, विद्यार्थीनींची बैठक घेवून त्यांना, महिला व बालकांचे संदर्भात घडणारे गुन्ह्यांची व बाल लैंगिक अपराधांची माहिती दिली. तसेच महिला व बालकांचे संदर्भातील कायद्यांची माहिती देऊन त्याबाबत मार्गदर्शन केले. तसेच बालगुन्हेगारी, बालकांना कमी वयात लागणारी व्यसने यांचेपासून बालकांना दूर ठेवण्यासाठी करावयाच्या उपाययोजना व घ्यावयाची खबरदारी यांबाबत माहिती दिली. येरवडा पोलीस ठाणेकडून बालकांचे सुरक्षेसाठी राबविण्यात येणारी पोलीस काका ही संकल्पना समजावून सांगून त्यांना काही तक्रारी असल्यास तात्काळ पोलीस काका कर्मचारी अथवा पोलीस ठाणे, चौकी यांना तात्काळ माहिती देणेबाबत आवाहन केले. त्याचबरोबर मा.पोलीस आयुक्त कार्यालय येथे बालके, महिला व जेष्ठ नागरिकांचे तक्रारींचे निराकरण करण्यासाठी नव्याने स्थापन करण्यात आलेल्या भरोसा सेल बाबत माहिती देऊन मार्गदर्शन केले आहे.

अशा प्रकारे श्री.राजेंद्र कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली येरवडा पोलीस स्टेशन कडील पो.उप.निरी. श्री. व्ही.जे.माने यांनी कम्युनिटी पोलीसींग व पोलीस काका संकल्पने अंतर्गत नेताजी हायस्कूल, येरवडा, पुणे येथे जावून तेथील शिक्षकांची तसेच विद्यार्थ्यांची भेट घेऊन त्यांना बालकांचे संरक्षणार्थ अंमलात असलेले कायदे व त्यातील तरतूदी समजावून सांगून मार्गदर्शन करून उल्लेखनिय कामगिरी केली आहे.





